N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Asst. Police Inspector P.S. Pimpalgaon (Hare)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** पिंपळगांव **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0123 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/05/2022 00:06 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 24/05/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/05/2022
   **Time From (वेळेपासून):** 15:16 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:16 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/05/2022 **Time (वेळ):** 22:36 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 018 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/05/2022 22:36 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वरसाडे,पाचोरा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** आत्माराम तुकाराम पवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरसाडे नं3तांडा,पाचोरा,पिंपळगांव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरसाडे नं3तांडा,पाचोरा,पिंपळगांव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9765793523**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | काशीनाथ राजधर सोनवणे | | | 1. प्लॉट नं-3शिवनेरी नगर भडगाव , चाळीसगाव,पिंपळगांव,जळगाव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | शिवदास भुरा राठोड | | | 1. अरुण नगर पिंपळगाव हरे ,पाचोरा, पिंपळगांव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रक्कम 4000/ रुपये,( त्यात 500/ रुपये दराच्या 8 चलनी नोटा) | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकत- यातील फिर्यादी हे दि-15/08/2017पासुन ग्रामपंचायत वरसाडे येथे प्र पा ता पाचोरा येथे ग्राम सेवक म्हणुन मानधनावर काम करतात फिर्यादी यांनी दि-15/08/2017 ते आज पावेतो ग्रामपंचायत वरसाडे प्र पा अंतर्गत केलेल्या कामाची मानधनाचा 15998/- रुपायाचा चेक तयार करुन त्यावर ग्रामसेवक म्हणुन के आर सोनवणे यांनी सही करुण देण्याच्या मोबदल्यात व शिवदास राठोड यांनी सरपंच म्हणुन त्यांच्या पत्नीची सहि आणुन देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांच्याकडे 6000/- लाचेची मागणी करीत आसल्याबाबत फिर्यादी यांनी दि-24/05/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती सदर तक्रारीची दि-24/05/2022 रोजी ला प वि जळगाव पथकाने पंच व साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र 1)यांनी आरोपी क्र2)यांच्या उपस्थितीत दि -24/05/2022रोजी पंचा समक्ष तडजोडी अंती फिर्यादी यांच्या कडे 4000/- लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र 2) यांनी स्विकारण्यास संमती दिली त्यानंतर आरोपी 2)यानी आलोसे क्र1) यांच्या उपस्थित वरसाडे ग्रामपंचायत कार्यालयात पंचा समक्ष दि-24/05/2022रोजी 15-16 वा माझ्याकडुन 4000/-रुपये लाच रक्कम स्वता स्विकारली आहे ,म्हणुन त्यांच्या विरुध्द वर प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोलीस निरीक्षक एस के बच्छाव अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव हे करीत आहेत. सोबत फिर्यादीची टंकलिखीत प्रत जोडली आहे

Asst. Police Inspector P.S. Pimpalgaon (B)

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Vijay Bajirao Mali
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** PBMAH65675 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / Informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / Informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची सही)

**Name (नाव):** KRUSHNNA Bhagvan BHOYE
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** PNMH53772

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**:**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

फिर्याद

पिंपळगांव हरे.पोलीस स्टेशन
दिनांक २४.०५.२०२२

मी आत्माराम तुकाराम पवार, वय ४९ वर्षे, व्यवसाय मजुरी व ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा. रा.वरसाडे प्रगणे पाचोरा, तांडा नं.०३, ता.पाचोरा जि. जळगांव

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी व मुलाबाळांसह राहतो. दि.२३.०५.२०२२ रोजी रात्री मी जळगांव अँन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनेशी संपर्क साधुन वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक के.आर.सोनवणे व वरसाडे प्र.पा.येथील सरपंच लिलाबाई राठोड यांचे पती शिवदास राठोड यांचे विरूध्द लाचे सबंधी तकार असल्याचे कळविले होते. तेव्हा मी पाटील साहेब यांना दि.२४.०५.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आपणास शिंदाड कडुन पिंपळगांव हरेश्वर गावाकडे जाणा-या रस्त्यालगत १ कि.मी.अंतरावर भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.२४.०५.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.मी माझे स्वतःचे मोटार सायकलसह शिंदाड कडुन पिंपळगांव हरेश्वर गावाकडे जाणा-या रस्त्यालगत १ कि.मी.अंतरावर रोडावर उपस्थित होतो. तेव्हा एक खाजगी तवेरा वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात असलेले श्री.पाटील साहेब यांनी मला माझे नाव गाव विचारले व मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यांनतर श्री.पाटील साहेब यांनी स्वतःची ओळख करुन दिली. तसेच श्री.पाटील साहेब यांनी वाहनात उपस्थीत असलेले पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव साहेब यांनी सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव साहेब यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वतःचे हस्ताक्षरात को-या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

समक्ष हजर राहुन तकार लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझे पत्नी व मुलाबांळासह राहतो. मी शेतमजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझे शिक्षण १२ वी पावेतो झालेले असुन मी सुशिक्षीत बेरोजगार असल्याने दि.१५.०८.२०१७ पासुन ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.ता.पाचोरा येथे ग्राम रोजगार सेवक म्हणुन मानधनावर काम करतो.

माझी नियुक्ती ग्राम रोजगार सेवक म्हणुन ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.ता.पाचोरा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतील ठरावाव्दारे करण्यात आलेली आहे. माझेकडेस वरसाडे प्र.पा.या गांवात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत चालणा-या कामांची पाहणी करणे तसेच सदर कामाच्या ठिकाणावरील मजुरांचे मस्टर अद्यावत करण्याचे काम आहे. सदर कामाच्या मोबदल्यात मला पंचायत समिती पाचोरा यांचेकडुन ग्रामपंचायतीच्या मार्फतीने केलेल्या कामाच्या स्वरुपावरुन कमीशन स्वरुपात मानधन मिळते. सदरचे मानधन हे पंचायत समिती पाचोरा कार्यालयातुन वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायतीच्या सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा पिपंळगांव हरेश्वर येथील खात्यात जमा होते. त्यानंतर सदरचे मानधन हे मला ग्रामपंचायतीकडुन चेकव्दारे मिळणे अपेक्षित असते.

दि.१५.०८.२०१७ पासुन ते आजपावेतो मी वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायत अंतर्गत ग्राम रोजगार सेवक म्हणुन मी केलेल्या कामाची कोणतीही रक्कम मला मिळालेली नाही. त्यामुळे मी दि.२३.०५.२०२२ रोजी वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायत येथे गेलो. तेव्हा सदर कार्यालयात ग्रामसेवक के.आर.सोनवणे व सरपंच लिलाबाई राठोड यांचे पती शिवदास राठोड हे उपस्थित होते. तेव्हा मी ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांना ग्राम रोजगार सेवक म्हणुन केलेल्या कामाच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता, ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांनी मला सांगितले की, तुम्ही २०१७ पासुन आतापावेतो केलेल्या कामाचे पंचायत समिती,पाचोरा येथुन टप्याटप्याने एकुण १५,९९८/-रु.मानधन वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायतीच्या बॅकेच्या खात्यात जमा झालेले आहे. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांनी सांगितले की, तुमचे १५,९९८/-रु.रकमेचा चेक सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहीने तयार करुन भेटणार आहे. त्यासाठी तुम्ही आम्हाला ६,०००/-रु.आणुन दया, तुम्ही ६,०००/-रु. दिल्याशिवाय तुमच्या चेकवर ग्रामसेवक व सरपंच हे सहया करणार नाहीत. तुम्ही जर ६,०००/-रु.आणुन दिले नाही तर तुम्हाला १५,९९८/-रु.रकमेचा चेक तयार करुन मिळणार नाही, त्यामुळे तुम्हाला बॅकेतुन पैसे काढता येणार नाही असे सांगितले. तेव्हा मी ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना ६,०००/- रु. रक्कम कशाचे आहेत, त्याची सरकारी पावती वगैरे मिळेल का? असे विचारले असता त्यांनी तुम्हाला अशी कोणतीही पावती मिळणार नाही असे सांगितले.

त्यावेळी ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड हे मी ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.अंतर्गत ग्राम रोजगार सेवक म्हणुन केलेल्या कामाचे मानधनाचा १५,९९८/-रुपयांचा चेक तयार करुन त्यावर ग्रामसेवक म्हणुन के.आर.सोनवणे यांनी सही करुन देण्याच्या मोबदल्यात व शिवदास राठोड यांनी सरपंच म्हणुन त्यांच्या पत्नीची सही आणुन देण्याच्या मोबदल्यात शिवदास राठोड हे माझे कडेस ६,०००/-रु. लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले.

तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, तुम्ही मला चेक देवुन द्या, तो चेक वटवुन मी बॅकेतुन पैसे काढुन उदया दि.२४.०५.२०२२ रोजी मी तुम्हाला भेटतो असे सांगितले तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांनी मला सांगितले की, असा चेक देता येत नाही असे सांगितले. तेव्हा मी त्यांना उदया येवुन भेटतो असे सांगितले असता

ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला पिंपळगांव हरेश्वर येथील वरसाडे रोडवर येण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना होकार दर्शवुन सदर ठिकाणाहून निघुन आलो आहे.

माझी ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना ६,०००/–रु.लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना लाच रक्कम दिली नाही तर,ते मला मी ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.अंतर्गत ग्राम रोजगार सेवक म्हणुन केलेल्या कामाचे मानधनाचा १५,९९८/–रुपयाचा चेक तयार करुन त्यावर सहया करुन देणार नाहीत अथवा चेक देण्यास अडथळा निर्माण करतील.म्हणुन मी नाईलाजाने ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना ६,०००/–रु.लाच रक्कम देण्यास तयार झालो आहे.तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.बाबत तक्रार दिली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब हे मला व पंच क्र.१ यांना सुचना देत असतांना माझे मोबाईल फोन क्र. ९७६५७९३५२३ यावर ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांचा मोबाईल फोन क्र.८३२९३०१२४५ यावरुन फोन आला तेव्हा बच्छाव साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल फोनचा कॉल रिसीव्ह करुन स्पिकर ऑन केला. तेव्हा मी ग्रामसेवक के. आर.सोनवणे यांना मी आलो तिथं बँकेत असे सांगितले असता ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी आमचं काम झालं आहे असे सांगितले. तेव्हा मी त्यांना चालेल, तुम्ही चेकवर सही करुन दया, मी आणुन देतो ना असे सांगितले.तेव्हा ग्रामसेवक के.आर. सोनवणे यांनी लवकर या असे सांगितले. त्यानंतर मोबाईल फोन बंद झाला. तेव्हा मी बच्छाव साहेब यांना कळविले की, वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायतीचे खाते पिंपळगांव हरेश्वर येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया या शाखेत असुन ग्रामसेवक के.आर. सोनवणे हे बँकेचे कामासाठी बँकेमध्ये असल्याचे कळविले तसेच ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी लवकर येण्यास सांगितले असल्याने मी त्यांची भेट घेण्यासाठी पिंपळगांव हरेश्वर येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया या शाखेत जाणार असल्याचे कळविले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ यांना सदर ठिकाणी पाठविण्याचे ठरविले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचेजवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांची भेट घेण्यासाठी पिंपळगांव हरेश्वर येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्र १ यांचेसह पिंपळगांव हरेश्वर येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया येथे गेलो. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे हे सदर ठिकाणी दिसुन आले नाही.म्हणुन मी माझे मोबाईल फोनवरुन ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांचे मोबाईल फोनवर फोन करुन मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. तेंव्हा मी त्यांना भाउसाहेब कुठे आहे तुम्ही असे विचारले असता त्यांनी मला सरांकडे येवुन जा, तिथेच लिहुन देतो मग, दोघांच्या सहया होवुन जातील असे सांगितले. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी सरांकडे म्हणजेच सरपंच यांचे पती शिवदास राठोड यांचे घरी येण्यास सांगितले असल्याने व मला सरपंच यांचे पिंपळगांव हरेश्वर येथील अरुण नगर भागात असलेले घर माहीत असल्याने मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सरपंच यांचे पिंपळगांव हरेश्वर येथील अरुण नगर भागातील घरी गेलो. त्यानंतर मी माझी मोटार सायकल सरपंच यांचे घराचे बाहेर उभी केली. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सरपच यांचे घराचे वॉल कंपाउडंला असलेल्या लोखंडी गेट उघडुन आत गेलो. तेव्हा सदर घराचे पोर्चमध्ये ग्रामसेवक के.आर. सोनवणे व सरपंच लिलाबाई राठोड यांचे पती शिवदास राठोड हे खुर्च्यावर बसलेले होते. तेव्हा मी पंच क्र.१ यांचे सह ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांचे जवळ जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा माझेत व ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांचेत मराठी भाषेत तसेच माझेत व शिवदास राठोड यांचेत बंजारा भाषेत माझे ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.अंतर्गत ग्राम रोजगार सेवक म्हणुन केलेल्या कामाचे मानधनाचा चेक देण्याच्या कामाविषयी बोलणी झाली. त्यानंतर ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी त्यांचे जवळील तयार असलेला सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेचा १५,९९८/–रुपयांचा चेक मला दिला व उदया बँकेत जावुन जमा करण्यास सांगितले.तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला त्यांच्या उजव्या हाताचे पाच बोटे व डाव्या हाताचा एक बोट दाखवुन पैश्यांचा इशारा केला. तेव्हा मी त्यांना काहीतरी वाजवी घ्या ना सर, सहा हजार रुपये जास्त होता हेत असे सांगितले असता ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला ४०००/–रु.आणुन देजो असे सांगुन तडजोडीअंती ४०००/–रु.लाचेची मागणी केली. तेव्हा मी शिवदास राठोड यांचे समक्ष ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांना मग, ४०००/–रु.राठोड सरांकडे देवुन टाकील असे सांगितले असता शिवदास राठोड यांनी मानेने होकार दर्शविला त्याचवेळी ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी हो चालेल असे सांगुन होकार दिला व मला काही नाराज होवु नका असे सांगितले. तेव्हा मी त्यांना नाराज नाही असे सांगितले. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला उलट आम्ही काम आणु, तुला जास्त मानधन भेटेल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना हो चालेल, मी येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझेत व ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांचेत मराठी भाषेत तसेच माझेत व शिवदास राठोड यांचेत बंजारा भाषेत झालेले ध्वनीमुद्रीत संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले. तेव्हा दोन्ही पंच व बच्छाव साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाली. त्यानंतर मी बच्छाव साहेब यांना कळविले की, ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड हे वरसाडे प्र.पा.ग्रामपंचायत येथे जाणार आहेत, मी जर आताच लाचेची रक्कम घेवुन वरसाडे ग्रामपंचायत येथे गेलो तर ते लागलीच लाचेची रक्कम स्विकारतील असे कळविले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी वेळ कमी असल्याने पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरीत्या करण्याचा निर्णय घेतला व मला पंच क्र.१ यांचेसह वरसाडे ग्रामपंचायत कार्यालय येथे लाचेची रक्कम देण्यासाठी पाठविण्याचे

ठरविले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कारवाई पिपंळगांव हरेश्वर ते शिंदाड रोडवर पिंपळगांव हरेश्वर गावापासुन सुमारे १ कि.मि.अंतरावर रस्त्यालगत असलेल्या शेताजवळ जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मी, बच्छाव साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणाहुन निघुन पिपंळगांव हरेश्वर ते शिंदाड रोडवर पिंपळगांव हरेश्वर गावापासुन सुमारे १ कि.मि.अंतरावर रस्त्यालगत असलेल्या शेताजवळ गेलो.

त्यानंतर ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली ४,०००/– रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराच्या ०८ नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच कं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच कं.१ यांचेसह ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना त्यांचे मागणी प्रमाणे ४,०००/–रु.लाच रक्कम देण्यासाठी वरसाडे ग्रामपंचायत कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायलकसह निघुन वरसाडे ग्रामपंचायत जवळ गेलो. तेव्हा मी माझी मोटार सायकल सदर ग्रामपंचायतच्या बाहेर उभी केली. त्यानंतर मी व पंच कं.१ असे सदर ग्रामपंचायतच्या कार्यालयाचे आत गेलो. तेव्हा सदर कार्यालयात ग्रामसेवक के.आर.सानेवणे व शिवदास राठोड हे उपस्थित होते. तेव्हा मी ग्रामसेवक के.आर.सानेवणे व शिवदास राठोड यांची भेट घेतली. त्यानंतर मी माझे जवळ असलेली चेक जमा करण्याची स्लिप ग्रामसेवक के.आर.सानेवणे यांनी सांगितल्याप्रमाणे भरली. तेव्हा मी ग्रामसेवक के.आर.सानेवणे यांना किती दिवसात जमा होईल असे विचारले असता ग्रामसेवक के.आर.सानेवणे यांनी उदया मिळुन जाईल,लाल स्लिप भरुन पैसे काढुन घ्यायचे नाहीतर एटिएममधुन काढुन घ्यायचे असे सांगितले. त्यानंतर शिवदास राठोड यांनी मला त्यांच्या उजव्या हाताचा पहिला बोट व अंगठयाने पैश्यांचा इशारा करुन चार बोटे दाखविले. तेव्हा मी माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाच रक्कम ४,०००/–रु. उजव्या हाताने बाहेर काढून सदर लाच रक्कम शिवदास राठोड यांचे समोर धरली व बंजारा भाषेत मोजुन घ्या चार हजार रुपये आहेत असे सांगुन सदर लाचेची रक्कम शिवदास राठोड यांना दिली तेव्हा शिवदास राठोड यांनी सदर ४,०००/–रु.लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन सदर लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली व चालेल असे सांगितले. त्यानंतर मी ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांना उजव्या हाताच्या पहिल्या बोटाने व अंगठयाने पैशांचा इशारा करुन राठोड सरांकडे दिले आहेत असे सांगितले. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला किती? असे विचारले. तेव्हा मी त्यांना चार हजार रुपये असे सांगितले. तेव्हा ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांनी मला बरं... चांगल होवुन जाईल असे सांगितले. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी शिवदास राठोड यांना रंगेहाथ पकडले. त्यांनतर बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी बाजुलाच उभे असलेले ग्रामसेवक के.आर.सोनवणे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी ग्रामसेवक के.आर.सोनवणे व शिवदास राठोड यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी प्रथम ग्रामसेवक के.आर सोनवणे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव काशिनाथ राजधर सोनवणे, वय ५२,व्यवसाय नोकरी,ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय वरसाडे तांडा ता.पाचोरा जि.जळगांव रा. प्लॉट नं. ३, शिवनेरी नगर, भडगांव रौड चाळीगांव जि.जळगांव (खाते जिल्हा परिषद वर्ग–३) असे सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी शिवदास राठोड यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शिवदास भुरा राठोड, वय ६७ ,व्यवसाय शेती रा. अरूण नगर पिंपळगांव हरेश्वर ता.पाचोरा जि.जळगांव (खाजगी व्यक्ती) असे सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सदर ग्रामपंचायत कार्यालयात माझे, आरोपी शिवदास राठोड व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील कारवाई जळगांव येथे जावुन अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयात करण्यात आली. तसा सलगपणे एकत्रितरीत्या सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे मी ग्रामपंचायत वरसाडे प्र.पा.अंतर्गत ग्राम रोजगार सेवक म्हणुन केलेल्या कामाचे मानधनाचा १५,९९८/–रुपयांचा चेक तयार करुन देण्याच्या मोबदल्यात आलोसे कं.१ काशिनाथ राजधर सोनवणे, वय ५२, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय वरसाडे प्र.पा.ता.पाचोरा जि.जळगांव यांनी आरोपी कं.२ शिवदास भुरा राठोड, वय ६७, रा.अरूण नगर पिंपळगांव हरेश्वर ता.पाचोरा जि.जळगांव (खाजगी व्यक्ती) यांचे उपस्थितीत दि.२४.०५.२०२२ रोजी पंचासमक्ष तडजोडीअंती माझेकडेस ४,०००/–रु.लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी कं.२ यांनी स्विकारण्यास संमती दिली. त्यानंतर आरोपी कं.२ शिवदास राठोड यांनी आलोसे कं.१ काशिनाथ सोनवणे यांचे उपस्थितीत वरसाडे ग्रामपंचायत कार्यालयात पंचासमक्ष दि.२४.०५.२०२२ रोजी १५.१६ वा. माझेकडुन ४०००/–रु.लाच रक्कम स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी आलोसे कं.१ काशिनाथ राजधर सोनवणे व आरोपी कं.२ शिवदास भुरा राठोड यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

एस.के.बच्छाव
**पोलीस निरिक्षक**
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**फिर्यादीची सही**
ता.२४.०५.२०२२